NAAC "A++" Grade
with CGPA 3.52

# मीडिया स्पेक्ट्रम

मास कम्युनिकेशन विद्यार्थ्यांचे प्रायोगिक प्रकाशन

54th International Film Festival of India, Goa
20th – 28th November 2023

कोल्हापूर, दि. १ डिसेंबर २०२३ | इफ्फी विशेषांक २०२३ | खासगी वितरणासाठी

### गोव्यातील आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव

# ज्ञानरंजक सोहळा !

**पणजी : साईसिमरन घाशी**

गोव्यातील बहुचर्चित आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव (इफ्फी) विद्यार्थ्यांसाठी खऱ्या अर्थाने चित्रपटविषयक जाणीव वाढविणारा ज्ञानरंजक सोहळा ठरला. एम. ए. मास कम्युनिकेशनच्या विद्यार्थ्यांनी या सोहळ्यात सहभाग नोंदवत अनेक चित्रपट दिग्दर्शक, निर्माते, कलाकार तसेच समीक्षकांशी संवाद साधला.

जगभरात सर्वांत प्रतिष्ठित चित्रपट महोत्सवांपैकी एक असलेल्या ५४ व्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन २० नोव्हेंबर रोजी गोव्यातील डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी इनडोअर स्टेडियममध्ये झाले. या सोहळ्याला केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग ठाकूर, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, चित्रपट निर्माते, दिग्दर्शक, अभिनेते आणि अभिनेत्रींसह अनेक मान्यवर उपस्थित




होते. हा महोत्सव २० नोव्हेंबर ते २८ नोव्हेंबर २०२३ या काळात गोव्यात दिमाखात झाला.

या सोहळ्यात माधुरी दीक्षित यांना इंटरनॅशनल सिनेमा ॲचीव्हमेंट अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले. माधुरी दीक्षित यांनी हिंदी चित्रपटसृष्टीत आपल्या अद्वितीय नृत्य कौशल्याने आणि अभिनयाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले आहे.

उद्घाटन सोहळ्यात डायटर बर्नर दिग्दर्शित ऑस्ट्रियन चित्रपट अल्मा अँड ऑस्कर चा प्रीमियर **(वृत्त पान ४ वर)**



**पणजी : चित्रपट महोत्सवात प्रेक्षकांशी संवाद साधताना द शुगर एक्सपेरिमेंट चित्रपटाचे दिग्दर्शक जॉन टॉर्नब्लॅड. सोबत निर्माता फॅगेलस्ट्रोम.**

### दिव्यांगावरची डोळस फिल्म
## द शुगर एक्सपेरिमेंट

**पणजी : सुरज कांबळे**

५४ व्या इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल ऑफ इंडिया महोत्सवामध्ये 'द शुगर एक्सपेरिमेंट' हा चित्रपट पाहावयास मिळाला. एका स्वीडिश डेंटल हेल्थकेअर सेंटर मधील दिव्यांग व्यक्तींच्या आयुष्यावर भाष्य करणारा, दिव्यांग व्यक्तींना दिल्या जाणाऱ्या वागणुकीविषयी विचार करायला भाग पाडणारा हा चित्रपट आहे. इफ्फी महोत्सवामध्ये हा चित्रपट पाहण्यासाठी चित्रपटाचे दिग्दर्शक आणि लेखक 'जॉन टर्नब्लेड' हे उपस्थित होते. चित्रपट सुरू होण्याआधी त्यांनी उपस्थितांशी संवाद साधला. ते म्हणाले, दिव्यांग व्यक्तींना समाजाकडून आजही फारशी चांगली वागणूक मिळत नाही. त्यांच्या भावना समजून घेण्यासाठी ही व्यवस्था कमी पडते.त्यामुळे दिव्यांग व्यक्तींना त्यांचे हक्काचे जीवन चांगल्या प्रकारे जगता येत नाही. दिव्यांग व्यक्तींबद्दल समाजामध्ये सहानुभूती निर्माण होणे फार गरजेचे आहे. हा चित्रपट ९१ मिनिटांचा आहे. या चित्रपटाला उपस्थितांनी चांगला प्रतिसाद दिला.

## ‘पिकॉक’मध्ये झळकल्या मास कम्युनिकेशनच्या विद्यार्थिनी!

**पणजी : साईसिमरन घाशी**

पिकॉक या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या अधिकृत प्रकाशनात शिवाजी विद्यापीठाच्या एम. ए. मास कम्युनिकेशनच्या दोन विद्यार्थिनी झळकल्या. या नियतकालिकात साईसिमरन घाशी आणि मेलिना कालीचूर्ण या दोन विद्यार्थिनींचे इफ्फीसंदर्भातील मत प्रकाशित झाले आहे.

पिकॉक हे नियतकालिक दरवर्षी प्रकाशित केले जाते. भारतीय सिनेमांशी संबंधित विविध विषयांवरील लेख, तसेच चित्रपट परीक्षणे, चित्रपट निर्मात्यांच्या मुलाखती आणि महोत्सवाच्या बातम्या यामध्ये प्रकाशित केल्या जातात. हे नियतकालिक ऑनलाईन आणि इफ्फी




स्क्रीनिंगमध्ये विनामूल्य उपलब्ध केले जाते.

या अंकामध्ये मास कम्युनिकेशन विभागाच्या एम.ए.मास कम्युनिकेशन भाग एकची विद्यार्थीनी मेलिना कालिचूर्ण आणि भाग दोनची विद्यार्थीनी साईसिमरन घाशी यांनी गोव्यातील इफ्फी आणि गोव्यातील अनुभव थोडक्यात सांगितले आहेत.

पिकॉक नियतकालिकाचा २०२३ चा अंक विशेषतः भारतीय चित्रपटातील समावेशकता या विषयाला वाहिलेला आहे. या विषयाशी संबंधित विविध विषयांवर लेख आहेत प्रसिद्ध केले आहेत. यामध्ये भारतीय चित्रपटांमधील महिला आणि अल्पसंख्याकांचे प्रतिनिधित्व, सुलभ चित्रपट निर्मितीचे महत्त्व आणि सर्वसमावेशकतेला प्रोत्साहन देण्यासाठी चित्रपट महोत्सवांची भूमिका अशा काही विषयांचा समावेश आहे. याशिवाय महोत्सवाचा शुभारंभ, चित्रपट, द आर्चीज, सत्यजित रे जीवनगौरव पुरस्कार विजेते असगर फरहादी यांची मुलाखत, भारतीय चित्रपटांच्या इतिहासावर एक नजर आणि चित्रपटाच्या पुनरावलोकनासह इतर अनेक मनोरंजक लेखही आहेत. हा अंक दि.२० नोव्हेंबर २०२३ पासून दि.२८ नोव्हेंबर २०२३ पर्यंत रोज प्रकाशित झाला.



पणजी : इफ्फीत दाक्षिणात्य अभिनेता विजय सेतुपती यांनी उपस्थित प्रेक्षकांशी संवाद साधला.

## अभिनयासाठी ठराविक फॉर्म्युला नाही : सेतुपती

**पणजी : सूरज कांबळे**

अभिनय शिकण्याचा कुठलाही ठराविक फॉर्म्युला नाही. लेखकाने लिहिलेली स्क्रिप्ट कोणत्या उद्देशाने लिहिली आहे हे समजून घेणे आणि त्याला न्याय देणारी भूमिका साकारणे, ही एक कलाकार म्हणून फार महत्त्वाची बाब आहे, असे मत दाक्षिणात्य अभिनेता विजय सेतुपती यांनी व्यक्त केले. गोव्यातील ५४ व्या इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल ऑफ इंडिया या महोत्सवामध्ये सेतुपती यांनी हजेरी लावली. महोत्सवातील एका चर्चासत्रामध्ये त्यांनी उपस्थितांशी संवाद साधला. सिनेमा, अभिनय तसेच चित्रपट सृष्टीतील करिअर या विषयांवर त्यांनी दिलखुलासपणे चर्चा केली. उपस्थितांकडून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे त्यांनी अतिशय साध्या पद्धतीने समजून सांगितली.

## 'ए वतन मेरे वतन'च्या पोस्टरचे अनावरण

**पणजी : अथर्व यज्ञोपवित**

प्राइम व्हिडिओने त्याच्या बहुप्रतिक्षित मूळ चित्रपट ए वतन मेरे वतनचे एक खास प्रदर्शन सादर केले. खऱ्या घटनांनी प्रेरित एक थ्रिल-नाटक, ए वतन मेरे वतन कन्नन अय्यर यांनी दिग्दर्शित केले आहे. करण जोहर, अपूर्व मेहता आणि सोमेन मिश्रा यांनी हा चित्रपट तयार केला आहे. डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी इनडोअर स्टेडियममधील उद्घाटन समारंभ ऊर्जा, भावना आणि सकारात्मकतेने भरलेला होता. कारण देशातील सर्वात प्रतिभावान गायकांपैकी एक असलेल्या सुखविंदर सिंगने या देशभक्तीपर गीताच्या सादरीकरणाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. सारा अली खान, निर्माते अपूर्व मेहता आणि करण जोहर, दिग्दर्शक कन्नन अय्यर, अपर्णा पुरोहित आदी यावेळी उपस्थित होते.

## सलमानची इफ्फीत हजेरी

**पणजी : अथर्व यज्ञोपवित**

अभिनेता सलमान खानने गोव्यातील इफ्फीत हजेरी लावली. त्याची भाची अलीझे अग्निहोत्री आगामी 'फर्रे' चित्रपटात काम करत आहे. तिला पाठिंबा देण्यासाठी सलमान याठिकाणी आला होता. सलमान खान या चित्रपटाचा निर्माता आहे. कार्यक्रमात अलीझे, प्रसन्ना बिश्त, साहिल मेहता आणि झेन शॉ यांच्यासह 'फर्रे' चित्रपटातील कलाकार उपस्थित होते. तत्पूर्वी, सलमान खानने 'फर्रे' च्या ट्रेलरचे अनावरण केले. 'फर्रे' हा शब्द विद्यार्थ्यांनी परीक्षा हॉलमध्ये वापरणाऱ्या पेपर-उत्तरांच्या छोट्या चिठ्ठीसाठी वापरला आहे. 'फर्रे'चे दिग्दर्शन राष्ट्रीय पुरस्कार विजेते चित्रपट निर्माते सौमेंद्र पाधी यांनी केले आहे.

# हिंदुस्तान जिंदाबाद है, जिंदाबाद रहेगा!

## 'इफ्फी'त अभिनेता सनी देओल गरजला

**पणजी : दिव्या कांबळे**

गोव्यातील इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल ऑफ इंडियामध्ये गदर २ चित्रपटाने चर्चेत असलेला अभिनेता सनी देओलने आपला हुकमाचा डायलॉग ऐकवून उपस्थितांची वाहवा मिळविली. 'हिंदुस्तान जिंदाबाद था, जिंदाबाद है और जिंदाबाद रहेगा' अशी गर्जना करताच उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात त्याला दाद दिली.

या महोत्सवात सनी देओलने सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. चित्रपट निर्माते अनिल शर्मा आणि राजकुमार संतोषी यांच्यासह सनी देओल कार्यक्रमाला उपस्थित होता. कार्यक्रमादरम्यान सनी देओलने त्याच्या नुकत्याच रिलीज झालेल्या गदर २ च्या यशाबद्दल आणि तारा सिंग या त्याच्या पात्राबद्दल माहिती दिली. चित्रपट निर्माते राजकुमार संतोषी यांनी त्याचे कौतुक केल्यानंतर सनी देओल त्याच्या चित्रपट प्रवासाबद्दल बोलताना भावूक झाला. मला विश्वास आहे की इंडस्ट्रीने सनीच्या प्रतिभेला न्याय दिला नाही; परंतु शेवटी त्याला यश हे मिळालेच. राजकुमार संतोषीच्या कमेंटवर प्रतिक्रिया देताना, सनी देओल म्हणाला, मी खूप भावूक झालो आहे, ही माझी समस्या आहे.



पणजी : आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात उपस्थित प्रेक्षकांना डायलॉग ऐकवताना अभिनेता सनी देओल.

सनी देओल म्हणाला, मला आठवतं जेव्हा मी लष्कर, नौदल आणि हवाई दलातील लोकांना भेटलो होतो. मी केलेल्या चित्रपटांवर त्यांचा विश्वास होता, त्यातूनच मला प्रेरणा मिळाली.

गदर चित्रपटातील तारा सिंग या आपल्या पात्राविषयी सनी देओल म्हणाला, प्रत्येकाला तारा सिंगसारखे व्हायचे असते. पत्नीला तिचा नवरा तारासारखा हवा असतो. पतीला पत्नी सकीनासारखी हवी असते. आपल्या चित्रपटाच्या उत्तुंग यशाबद्दल ते म्हणाले, गदर ज्या प्रकारे यशस्वी झाला, त्याची मला अपेक्षाही नव्हती.

सनी देओल गदर : एक प्रेम कथा, घायाळ, बिग ब्रदर, दामिनी, डर, बॉर्डर आणि त्रिदेव यांसारख्या चित्रपटांसाठी प्रसिद्ध आहे. त्याने भाऊ बॉबी देओलसोबत यमला पगला दिवाना चित्रपट आणि पोस्टर बॉईज यांसारख्या चित्रपटांमध्ये सहकलाकार म्हणून काम केले आहे. अभिनयानंतर सनी देओलने राजकारणात प्रवेश केला आणि आता तो शेवटचा ब्लॉकबस्टर चित्रपट गदर २ मध्ये दिसत आहे.

# वृत्तपत्रांची किंमत वाढली पाहिजे

## संपादक किरण ठाकूर : इफ्फीत विद्यार्थ्यांशी साधला संवाद

**पणजी : सुरज कांबळे**

भारतात वर्तमानपत्रांच्या किमती खूपच कमी आहेत. सर्व माध्यमांनी एकत्र येऊन वृत्तपत्रांच्या किमती वाढविल्या पाहिजेत, असे मत दैनिक तरूण भारत समूहाचे प्रमुख आणि सल्लागार संपादक किरण ठाकूर यांनी व्यक्त केले.

गोव्यातील आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात ते सहभागी झाले होते. यावेळी पत्रकारिता तसेच मास कम्युनिकेशनच्या विद्यार्थ्यांनी त्यांची भेट घेतली. ठाकूर म्हणाले, काही वर्तमानपत्रे वाचकांना भेटवस्तू देऊन अंकाची किंमत वाढवत नाहीत. त्यामुळे किमतीत असमतोल निर्माण झाला आहे. सध्याची वर्तमानपत्रांची किंमत पाहिली असता, ती फार कमी आहे. वर्तमानपत्राचा उत्पादन खर्च बघितला असता सध्याच्या किमती वृत्तपत्रांना परवडत नाहीत. उत्पादन खर्चापेक्षा विक्रीमूल्य कमी असणे योग्य नाही. गोवा या राज्याचा विचार केला असता, वाचकांना भेटवस्तू आणि विविध ऑफर्सचे अमिष न दाखवता येथील वृत्तपत्र व्यवस्थापनांनी एकमेकांशी विचारविनिमय करून सर्वच वृत्तपत्रांची किंमत किमान दहा रुपये केली पाहिजे, असे त्यांनी नमूद केले.



पणजी : आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात दैनिक तरूण भारतचे समूह प्रमुख आणि सल्लागार संपादक किरण ठाकूर यांची पत्रकारिता व मास कम्युनिकेशनच्या विद्यार्थ्यांनी भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला.

वृत्तपत्रातील आर्थिक उलाढालींविषयी त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. वर्तमानपत्राचे अर्थकारण दिवसेंदिवस बदलत चालले असून सर्वच व्यवस्थापनांनी त्याचा विचार केला पाहिजे, असेही त्यांनी सुचविले.

मीडिया स्पेक्ट्रम या इफ्फी विशेषांकाचे संपादन एम. ए. मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी करून खासगी वितरणासाठी प्रकाशित केले.
संपादकीय मंडळ : साईसिमरन घाशी, मेलिना कालिचुर्ण, सुरज कांबळे, अथर्व यज्ञोपवित, दिव्या कांबळे. संपादन सहाय्य : डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. प्रसाद ठाकूर.

# Absolutely beautiful Baga Beach

**Panjim : Melina Kallychurn**

When I visited Baga Beach in Goa with friends, it was an experience I will never forget. An inviting atmosphere was created by the lively ambiance. We relaxed on the smooth sands and took in the cool sea breeze as we basked in the sun. The beach was hopping with activity, providing thrill-seekers of water sports. Our time at Baga Beach was genuinely delightful and unforgettable because of the lively beach vibes, laughter, and friendliness.

Watersports enthusiasts and tourists in their hundreds flock to Baga, a well-known beach resort in North Goa. The beach is bordered by the communities of Sinquerim, Candolim, and Baga; the shoreline of Baga is more vibrant and alluring. One of the nicest beaches in Goa that is lively all night long is this one. Known as "The Hometown of Nightlife," Baga beach is well-known for its delicious food, designer stores, adventure sports, and rowdy music festivities that go till late at night.

Baga Beach gained popularity with visitors from overseas, and gradually new thrilling activities like paddleboarding, fishing, nightclubs, and tattoo parlors arose on the mainland.



**View of Baga Beach**

## Opening Ceremony...




**Panjim : Union Minister of Information & Broadcasting Anurag Singh Thakur inaugurated the opening ceremony of the International Film Festival of India (IFFI 2023), Goa in the presence of Union MoS of I&B, Dr. L. Murugan, Union MoS of Tourism Shripad Naik, Chief Minister of Goa Dr. Pramod Sawant and others.**

# Travelling in Goa; A peaceful journey

**Panjim : Melina Kallychurn**

I was a student delegate, therefore my trip to the International Film Festival of India in Goa was a rewarding experience that included both the colorful spirit of the area and cinematic masterpieces. My four days in the tranquil Calangute Lagoon Villa served as a welcome haven from the intense heat.




The event was held in Panaji, and pleasant exploration of the city was made possible by the need for light, breathable clothing in the hot heat.

Traveling locally was inexpensive but provided a rich experience as you made your way through Goa's busy streets and bridges. It was a beautiful night to travel. I was able to see the beauty around me and have a peaceful journey thanks to the well-lit paths.

Seeing the movie "Extra Lessons" at Porium was one of my favorite activities. I got to see a different part of Goa and enjoy the incredible films that were screened during the festival, which made it a unique trip.

It was an amazing sight to traverse the Goan bridges by day or night. In addition, I took comfort in discovering the local way of life amid the bustle of the festival, which included a trip to a quaint church that was a picture of architectural magnificence and historical significance.

## Vijay Sethupathi - A talented actor

**Panjim : Melina Kallychurn**

I was present at a lively Q&A session with actor Vijay Sethupathi and Kushboo Sundar at the event held at Kala Academy in Panaji. Renowned for his versatile roles and outstanding performances, Vijay Sethupathi opened up about his incredible journey in the film industry.

Vijay Sethupathi talked passionately about how he selects his roles based on the depth and substance of the characters rather than their commercial appeal, citing his memorable roles in films like "Super Deluxe," "96," and "Vikram Vedha" as well as his more recent works. The discussion with Vijay Sethupathi demonstrated his kindness and humility.

# Tasty and memorable Goan food!

**Panjim : Melina Kallychurn**

Goan food is mostly spiced and flavorful because it is situated on India's west coast, by the Arabian Sea. Goan cuisine consists primarily of rice and fish curries. Coconuts, rice, fish, pig, beef, and regional spices like kokum are all included in the majority of the recipes. Goan cuisine is primarily composed of seafood, such as mackerel,



tuna, shark, and pomfret. Before 1961, Goa was a Portuguese colony, hence the majority of their cuisine was influenced by the Portuguese.

While in Goa, I enjoyed the delicious delicacies of the area, particularly the varied selection of vegetarian thali. This was a typical platter with a variety of delicious meals that showcased Goa's rich culinary heritage. The dish was tempting and included favorites like fiery and tangy sol kadhi, fragrant vegetable curry, and xacuti, a cozy vegetable stew with lots of coconut.

The flavorful and crunchy bhindi fry (okra fry), the comforting dal with its fragrant spice blend, and the cool, sweet sannas (steamed rice cakes). Every dish was a distinct symphony of flavors that honored the core of Goan cuisine and left a lasting impression on my palate and emotions.

## आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव : ज्ञानरंजक सोहळा!

**(पान एक वरून)** करण्यात आला. इफ्फी २०२३ मध्ये ७९ देशांमधील २८० चित्रपट प्रदर्शित केले गेले. यामध्ये १८३ आंतरराष्ट्रीय चित्रपट, ८७ भारतीय चित्रपट आणि १० लघुपट समाविष्ट होते. या महोत्सवात अनेक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवासाठी बॉलीवूड मधील सलमान खान, सारा अली खान, राणी मुखर्जी, करण जोहर, जोया अख्तर, दाक्षिणात्य अभिनेत्री श्रेया सरन, दाक्षिणात्य अभिनेते विजय सेतुपती, मुकुंदन, आर. माधवन, के. के. मेनन, मनोज वाजपेयी, दिवेंडू शर्मा यांच्यासह अनेक दिग्गज व्यक्तींनी हजेरी लावली. आकर्षक रोषणाई, रंगबिरंगी पुतळे, देशाच्या अनेक कोपऱ्यातून तसेच विविध देशातून आलेले लोक, नवी संस्कृती आणि तेथील आल्हाददायक वातावरण हे सर्व मनाला भारावून टाकणारे होते. मंगळवार (दि. २८) रोजी संध्याकाळी पणजी येथील डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी इनडोअर स्टेडियममध्ये भव्य समारोप समारंभ आणि पुरस्कारांच्या घोषणेने नऊ दिवस चालणाऱ्या या महोत्सवाची सांगता झाली. या महोत्सवात दिग्दर्शक अब्बास अमिनी यांच्या पर्शियन चित्रपट एंडलेस बॉर्डर्सला सर्वोत्कृष्ट चित्रपटासाठीचा प्रतिष्ठित गोल्डन पीकॉक पुरस्काराने गौरविण्यात आले. हॉलिवूड अभिनेता-निर्माता मायकेल डग्लस यांना इफ्फीच्या समारोप समारंभात सत्यजित रे जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत आणि अभिनेता आयुष्मान खुराना यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा महोत्सव भारतीय आणि आंतरराष्ट्रीय चित्रपटसृष्टीतील कलाकारांना एकत्र आणणारा आणि चित्रपटाच्या जगात नवीन क्षितिजे उघडणारा ठरला.

## गोव्यातील इफ्फी आणि कला अकादमीचे नाते अतूट

**पणजी : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव हा भारतातील सर्वात मोठा आणि प्रतिष्ठित चित्रपट महोत्सव आहे. हा महोत्सव दरवर्षी गोव्यातील कला अकादमी परिसरात आयोजित केला जातो. कला अकादमी ही गोवा सरकारद्वारे चालवली जाणारी एक प्रमुख सांस्कृतिक संस्था आहे. या इमारतीत एक मोठा थिएटर, एक ब्लॅक बॉक्स, एक प्रिव्ह्यू थिएटर, एक प्रदर्शन हॉल, एक ग्रंथालय आणि इतर अनेक सुविधा आहेत. कला अकादमी हे गोव्यातील एक ऐतिहासिक आणि महत्त्वाचे सांस्कृतिक स्थळ आहे. या ठिकाणी अनेक वर्षांपासून चित्रपट महोत्सवाचे आयोजन केले जाते. एका अर्थाने कला अकादमी आणि इफ्फी यांचे नाते अतूट आहे.

# गोव्यातील पर्यटनाला बुस्ट!

**पणजी : साईसिमरन घाशी**

गोवा हे भारतातील एक लोकप्रिय पर्यटन स्थळ आहे. त्याचे नयनरम्य समुद्रकिनारे, ऐतिहासिक स्थळे आणि समृद्ध सांस्कृतिक वारसा यामुळे ते जगभरातील पर्यटकांना आकर्षित करते. नोव्हेंबर महिन्यात गोव्यात आयोजित केलेला आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव गोव्याच्या पर्यटनाला बुस्ट देऊन गेला.

यंदाच्या वर्षी इफ्फी अनुभवताना गोव्यातील पर्यटन व्यवसायात मोठी वाढ झाल्याचे दिसले. गोव्यात येणाऱ्या पर्यटकांची संख्या दुप्पट झाली होती. पर्यटक चित्रपट महोत्सवासाठी येतात;परंतु त्याचबरोबर गोव्यातील इतर पर्यटन स्थळांनाही भेट देतात. यामुळे गोव्यातील हॉटेल व्यवसाय, रेस्टॉरंट व्यवसाय, कला आणि हस्तकला व्यवसायांना चालना मिळाली.

इफ्फीच्या काळात गोव्यातील वातावरण उत्सवमय होते. चित्रपट महोत्सवात सहभागी होणारे देशविदेशातील चित्रपट निर्माते, कलाकार, दिग्दर्शक आणि इतर मान्यवर गोव्यात येतात. यामुळे गोव्यातील सांस्कृतिक जीवनालाही चालना मिळाली.



**पणजी : इफ्फीच्या काळात गोव्यातील बाजारपेठा अशा सजलेल्या असतात.**

इफ्फीच्या काळात गोव्यातील हॉटेल, रेस्टॉरंट आणि इतर पर्यटन सुविधांमध्ये विशेष सवलती आणि ऑफर्स दिल्या जातात. यामुळे पर्यटकांना गोव्याला भेट देण्याची अधिक इच्छा होते. या काळात गोव्यातील रस्ते, वाहतूक आणि सुरक्षा व्यवस्था चांगली असते. ज्यामुळे पर्यटकांना गोव्यात सुरक्षित वाटते. पर्यटन गोव्यातील अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाचे आहे. त्यामुळे गोव्यातील रोजगार निर्मिती होते आणि राज्याच्या महसूलात वाढ होते. या दरम्यान पर्यटनाला चालना देण्यासाठी सरकार आणि स्थानिक प्रशासनाने उपाययोजना केल्याचे दिसून आले.

गोव्यात या काळात विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. या कालावधीत गोव्यात प्रचार आणि जाहिरात मोहिमा राबवल्या जातात. या उपाययोजनांमुळे इफ्फीच्या काळातील पर्यटन आणखी वाढून आणि गोव्यातील अर्थव्यवस्थेवर सकारात्मक परिणाम झाल्याचे दिसून आले.

# साराचे काम ‘काबिल ए तारीफ’

## करण जोहरचे गौरवोद्गार : स्वातंत्र्यसैनिकाच्या भूमिकेला न्याय

**पणजी : दिव्या कांबळे**

गोव्यातील इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल ऑफ इंडियामध्ये एका चर्चासत्रामध्ये बॉलीवूड पॉवरहाऊस करण जोहरने तिच्या आगामी 'ए वतन मेरे वतन' चित्रपटासाठी सारा अली खानवर कौतुकाचा वर्षाव केला. साराने केलेले काम म्हणजे 'काबिल ए तारीफ'असेच आहे, असे तो म्हणाला.

साराचे कौतुक करताना करण जोहर म्हणाला, एक अभिनेत्री म्हणून किंवा स्वातंत्र्यसैनिक म्हणून तुम्ही परिस्थितीच्या अडथळ्यांशी लढत आहात. ही भूमिका खरोखरच सारा या व्यक्तीशी मिळतीजुळती आहे. ज्यात तिचे देशाबद्दलचे प्रेम आहे आणि ती साकारू शकणाऱ्या कामासह पात्रात रूपांतरित होण्याची तिची क्षमता आहे.



खऱ्या घटनांनी प्रेरित असलेला हा चित्रपट धैर्य आणि देशभक्तीची आकर्षक कथा आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात मोलाची भूमिका बजावणाऱ्या शूर स्वातंत्र्यसैनिक उषा मेहता यांची भूमिका साकारत सारा अली खान कलाकारांचे नेतृत्व करताना या चित्रपटात दिसत आहे, असे करणने नमूद केले. कार्यक्रमादरम्यान, सारा अली खानने या चित्रपटाबद्दलचे तिचे विचार व्यक्त केले आणि करण जोहर यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

# चित्रपट महोत्सवात प्रवाशांसाठी मोफत रिक्षा!

**पणजी : साईसिमरन घाशी**

आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव हा भारतातील सर्वात प्रतिष्ठित चित्रपट महोत्सवांपैकी एक आहे. दरवर्षी नोव्हेंबर महिन्यात होणाऱ्या या महोत्सवात जगभरातील चित्रपट दिग्दर्शक, अभिनेते, अभिनेत्री आणि इतर चित्रपट क्षेत्रातील मान्यवर सहभागी होतात. यावर्षी महोत्सवाच्या काळात डेलिगेट्सकरिता अनेक सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या गेल्या होत्या. त्यापैकी एक म्हणजे मोफत रिक्षा सेवा. या सेवेचा लाभ घेण्यासाठी डेलिगेट्सना फक्त इफ्फी ओळखपत्र दाखवावे लागत होते.

रिक्षा सेवा महोत्सवाच्या मुख्य ठिकाणांसह इतर महत्त्वाच्या ठिकाणी उपलब्ध होती. यामध्ये महोत्सवाचे मुख्य सभागृह, चित्रपट दालने, हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि इतर पर्यटन स्थळांचा समावेश होता.

रिक्षाच्या पाठीमागे मोफत हेल्पलाईन नंबर देखील देण्यात आला होता. जेणेकरून चुटकीसरशी या सुविधेचा लाभ घेता येईल. मोफत रिक्षा सेवेमुळे देशविदेशातील डेलिगेट्सना महोत्सवात विविध ठिकाणी सहभागी होणे अधिक सोयीस्कर झाले होते. त्यांच्या वाहतूक खर्चाचा भार वाचला आणि ते महोत्सवाच्या सर्व कार्यक्रमांना सहजपणे वेळेत पोहोचू शकले. या सेवेचा अनेकांनी लाभ घेतला. शिवाय या सेवेबद्दल विविध देशांतून आलेल्या नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

ही सेवा खूप उपयुक्त आहे. यामुळे महोत्सवाच्या ठिकाणी आणि शहरातील इतर ठिकाणी जाण्यासाठी आम्हाला कोणतीही चिंता करण्याची गरज नाही.

**-नीना रेड्डी,** तामिळनाडू

ही सेवा खूप वेळ वाचवते. यामुळे आम्हाला महोत्सवाच्या चित्रपट पाहण्यासाठी वेळ मिळतो.

**-रमेश दास,** बांग्लादेश

ही सेवा खूप सुरक्षित आहे. रिक्षा चालकांनी आम्हाला सुरक्षितपणे ठिकाणी पोहोचवले.

**जोझेफ डिसुझा,** मुंबई